WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | शुक्रवार , 25 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 134 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

## बीड, जालन्यात पीक परिस्थितीची करणार पाहणी ; २७ ला बीडच्या संपर्क कार्यालयाचे लोकार्पण ; विविध कार्यक्रमांना राहणार उपस्थित

# ना. पंकजाताई मुंडे यांचा २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान परळी, बीड, जालना दौरा

■ बीड प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे या २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान परळी, बीड, छत्रपती संभाजीनगर आणि जालना दौऱ्यावर येत आहेत. कमी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाल्याने त्या बीड व जालना जिल्ह्यातील पीक परिस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध सामाजिक उपक्रम, संघटनात्मक बैठका, शिक्षक पुरस्कार वितरण, गुजर समाज मेळावा आदी विविध कार्यक्रमांना त्या उपस्थित राहणार आहेत. रविवारी २७ रोजी ना . पंकजाताई मुंडे यांच्या बीड येथील संपर्क कार्यालयाचा शुभारंभ होणार आहे. ना. पंकजाताई मुंडे येत्या शनिवारी २६ रोजी परळीत असणार आहेत. यादिवशी सकाळी १०.३० वा. सावतामाळी मंदिर परिसरात संत रोहिदास महाराज यांचा कलश पूजन कार्यक्रम, सकाळी ११ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा संकल्प अभियान अंतर्गत औद्योगिक वसाहत सभागृहात रांगोळी स्पर्धा, अंगणवाडी सेविकेचा सन्मान आणि महिला रिक्षाचालकांना वाहन परवान्यांचे वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी ४ वाजता सेवा संकल्प अभियान अंतर्गत अंबाजोगाई येथील मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात त्यांच्या उपस्थितीत चित्रकला, निबंध आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.



### २७ सप्टेंबर : पीक परिस्थितीची पाहणी, बीड येथे संपर्क कार्यालयाचे उद्घाटन आणि विविध कार्यक्रम

रविवारी, २७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ना. पंकजाताई परळीत भाजपा कार्यकर्त्यांसमवेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. दुपारी २.३० वाजता अंबाजोगाई-केज-नेकनूर परिसरातील पीक परिस्थितीची पाहणी करून त्या शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. त्यानंतर दुपारी ४ वाजता बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील हॉटेल निलकमलच्या बाजूच्या कॉम्प्लेक्समध्ये संपर्क कार्यालयाचे उद्घाटन कार्यक्रमास त्या उपस्थित राहतील. दुपारी ४.३० भाजप जिल्हा कार्यकारिणीच्या बैठक, सायंकाळी ५.३० वाजता केएसके महाविद्यालयात कल्पतरु बीड आयोजित गणेशोत्सव देखावा स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण, सायंकाळी ६ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा त्यानंतर सायंकाळी ७.१५ वाजता नगर रोडवरील श्रीराम मंगल कार्यालयात गुजर समाज सेवा संघाच्या वतीने आयोजित मेळाव्यास त्या उपस्थित राहणार आहेत.

### २८ सप्टेंबरला जालन्यात पीक पाहणी

सोमवारी, २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयातील भानुदास सभागृहात ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानच्या वर्धापनदिनानिमित्त ज्येष्ठ पशुवैद्यकांच्या पुरस्कार सोहळ्यास पंकजाताई मुंडे उपस्थित राहणार आहेत असून त्यानंतर दुपारी २.३० जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पीक परिस्थितीची पाहणी करणार आहेत.

## बहुजन विकास सांस्कृतिक कला मंचच्या परळी तालुका अध्यक्षपदी अनंत मुंडे यांची निवड

■ परळी / प्रतिनिधी

बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच मुंबई, या महाराष्ट्र राज्य शासनमान्य संस्थेच्या परळी तालुकाध्यक्षपदी येथील सुप्रसिद्ध शाहीर तथा नामवंत कवी अनंत मुंडे यांची निवड करण्यात आली आहे.

राज्यातील तळागाळातील कलावंतांना शासनाच्या सवलती, शासनाचे मानधन मिळवून देण्यासाठी व सांस्कृतिक चळवळ गतिमान करण्यासाठी तसेच याशिवाय छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आदी महामानवांच्या विचारांचा प्रचार व प्रसार सांस्कृतिक चळवळीतून प्रभावीपणे करून ही चळवळ अधिक गतिमान करण्याच्या उद्देशाने बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष गीतकार तथा सुप्रसिद्ध गायक दत्ताजी शिंदे यांनी परळी तालुक्याचे अध्यक्ष म्हणून कवी /शाहीर अनंत मुंडे यांची निवड केली आहे.

आजवर अनंत मुंडे यांनी शैक्षणिक,साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय तसेच भरीव योगदान दिलेले आहे.



याचीच दखल म्हणून बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच मुंबई या शासन मान्य संस्थेने अनंत मुंडे यांची निवड केल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. या निवडीबद्दल त्यांचे मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष मा.श्री.पी.एस.घाडगे,केज येथील टाकळी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री बाबासाहेब केदार,मसापचे अध्यक्ष विजयसेठ वाकेकर, सचिव प्रा.राजकुमार यल्लावाड, बंडू अघाव, कवी अरुण पवार, संजय आघाव, बालाजी कांबळे, दिवाकर जोशी, सिध्देश्वर इंगोले,प्रा.अर्चना चव्हाण राजू शिंदे आदींनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## अनंत चतुर्दशीनिमित्त नवी मुंबईमध्ये वाहतुकीत मोठे बदल; घरगुती प्रवाशांसाठी महत्त्वाचे रस्ते बंद, पर्यायी मार्गांची घोषणा

■ नवी मुंबई : प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या अखेरच्या टप्प्यात म्हणजेच अनंत चतुर्दशीनिमित्त बाप्पाला साश्रू नयनांनी निरोप देण्यासाठी सर्वत्र तयारी सुरू आहे. यादरम्यान, गणेश मूर्ती विसर्जन मिरवणुका सुरळीत पार पाडाव्यात आणि नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागू नये, यासाठी नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी कंबर कसली आहे. सुरक्षेची काळजी घेत पोलिसांनी शहरातील अनेक महत्त्वाचे रस्ते आणि मार्ग वाहतुकीसाठी बंद केले असून, खारघर व कळंबोली परिसरात विशेष वळणमार्ग (पर्यायी मार्गांची) घोषणा करण्यात आली आहेण्

मिळालेल्या माहितीनुसार, हे वाहतूक निर्बंध २५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून लागू होणार असून, विसर्जन मिरवणुका पूर्ण होईपर्यंत अंमलात राहतील. हे निर्बंध निर्धारित मार्गांवरील गणेश विसर्जन वाहने, पोलीस वाहने, शासकीय वाहने आणि अत्यावश्यक सेवा पुरवणारी वाहने वगळता इतर सर्वसामान्य नागरिकांच्या




वाहनांना लागू असणार आहेत. "अनंत चतुर्दशीच्या दिवशी वाहनांची मोठी वर्दळ अपेक्षित असल्याने रहिवाशांनी प्रतिबंधित मार्ग टाळावेत आणि प्रशासनाने निश्चित केलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा," असे आवाहन नवी मुंबईचे पोलीस उपआयुक्त (वाहतूक) डॉ. राहुल खाडे यांनी केले आहे.

### खारघरमधील बंद रस्ते आणि वळणमार्ग

खारघर परिसरात, डी-मार्ट सिग्नल आणि डीएव्ही इंटरनॅशनल स्कूलच्या कोपऱ्यादरम्यान दोन्ही दिशांची वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच खारघर गाव मेट्रो स्टेशन आणि दिवंगत सुदाम भिकाजी पाटील कमानीसमोरील कामधेनू कॉम्प्लेक्समागील रस्ताही बंद राहील. पर्यायी मार्ग: डी-मार्ट सिग्नलकडून डीएव्ही स्कूलकडे जाणारे नागरिक सेक्टर १८ आणि १९ मार्गे जाऊ शकतात. तर विरुद्ध दिशेने जाणारे वाहनचालक वास्तुविहार चौकात उजवीकडे वळून बालाजी स्वीट्स, शिल्प चौक आणि डी-मार्ट मार्गे पुढे प्रवास करू शकतात.

## उल्लेखनीय कार्याबद्दल भगवान शिनगीरे व अरुण पडोळे यांचा सहाव्यांदा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गौरव

■ आष्टी (प्रतिनिधी) :

आष्टी तालुक्यातील वटनवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा माजी सरपंच भगवानराव शिनगीरे आणि अरुणजी पडोळे यांनी सामाजिक व विविध क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांचा प्रशस्तीपत्र देऊन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २४ सप्टेंबर) बीड येथे गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे, उल्लेखनीय कार्याबद्दल जिल्हाधिकारी यांच्या हस्ते शिनगीरे यांचा हा सहाव्यांदा गौरव झाल्याने त्यांच्या कार्याची जिल्हा प्रशासनाकडून पुन्हा एकदा दखल घेण्यात आली आहे.

बीड येथे झालेल्या या गौरव सोहळ्यावेळी जिल्हा उपनिबंधक सतीशजी तोटावर, अशोक कवडे, सतीश पोकळे, रामकृष्ण बांगर, राजाभाऊ मुंडे आदी उपस्थित होते. भगवानराव शिनगीरे यांच्यासोबत डीसीसी बँकेचे तालुका ज्येष्ठ तपासणीस शरदजी आजबे, सचिव महेशजी कोकणे, चेअरमन नवनाथराव वाघुले आदींचीही उपस्थिती होती.

भगवानराव शिनगीरे हे सामाजिक कार्यासोबतच गावाच्या विकासाच्या विविध उपक्रमांमध्ये सातत्याने सक्रिय राहिले आहेत. त्यांच्या कार्याची विविध स्तरांवर दखल घेण्यात आली असून यापूर्वीही जिल्हाधिकारी यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला आहे. यावेळी पुन्हा एकदा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान झाल्याने वटनवाडी परिसरातील नागरिकांकडून शिनगीरे आणि पडोळे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



संपादकीय

## उष्माघाताचे संकट!

यंदाचा उन्हाळा केवळ घामाच्या धारा काढणारा नसून अंगाची लाहीलाही करणारा आणि जीवघेणा ठरू लागला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देश सध्या एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करत असून, तापमानाने चाळिशी केव्हाच ओलांडून आता ४७ अंशांच्या दिशेने कूच केली आहे.

महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वाळाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू-काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजाचा ठोका चुकवणारी आहे. राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू-काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे. परभणीपासून हिंगोलीपर्यंत आणि नगरपासून नागपूरपर्यंत सात-आठ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. शेतात राबणारा शेतकरी आणि कामासाठी पायपीट करणारा कष्टकरी आज या निसर्गनिर्मित संकटाचा बळी पडत आहे, हे विदारक सत्य आहे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, ही दाहकता केवळ ऋतुचक्राचा भाग नसून 'हवामान बदलाचा' एक धोक्याचा इशारा आहे. वाढते सिमेंटचे जंगल आणि बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळला असून, जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही आता नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. पूर्वी मे महिन्यात जाणवणारे उन्हाचे चटके आता मार्च-एप्रिलमध्येच अंगाची लाहीलाही करत आहेत. मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जाणे, ही धोक्याची घंटा मानली जात होती. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये तर अनेक ठिकाणी तापमान ४७ - ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

वाढत्या धोक्यामुळे सरकारकडून अनेक जिल्ह्यांत 'येलो अलर्ट' जारी केला आहे. उष्माघात हा या हवामान बदलाचा सर्वात घातक परिणाम आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडते, ज्यामुळे गंभीर आजार किंवा मृत्यू ओढवू शकतो. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या दशकात देशात उष्णतेमुळे हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. शेतमजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते यांसारख्या उघड्यावर काम करणाऱ्या वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्णतेचे हे संकट केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाही. कडक उन्हामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतोय. तसेच, वाढत्या वीज वापरामुळे ऊर्जेची टंचाई निर्माण होऊन वीज कपात करावी लागत आहे. 'श्रम उत्पादकता' कमी झाल्यामुळे देशाच्या जीडीपीवरही याचा नकारात्मक परिणाम होत असल्याचे जागतिक अहवाल सांगतात. उष्णतेमुळे पिकांवर ताण येतो आणि पाण्याची मागणी वाढते. हिमालयातील बर्फ वितळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे नद्यांच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम होत आहे. राज्यातील विदर्भात, विशेषतः अकोला येथे तापमान ४६.९° सेल्शिअसवर गेल्याने सध्या विदर्भ हा उष्माघाताचा 'हॉटस्पॉट' ठरला आहे. महाराष्ट्रात २०२६ च्या उन्हाळ्यात आतापर्यंत उष्माघातामुळे ७ ते ८ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. परभणीत ३७ वर्षीय व्यक्तीचा उष्माघाताने मृत्यू झाला असून, अहिल्यानगरात ४५ वर्षीय महिला शेतकरी शेतात काम करताना दगावली. नागपूर जिल्ह्यात बसने प्रवास करणाऱ्या ६५ वर्षीय प्रवाशाचा मृत्यू झाला, अशी उदाहरणे देता येतील. उष्णतेच्या लाटांमुळे शरीरातील पाणी कमी होणे (डिहायड्रेशन), उष्माघात आणि



मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत स्वतःची काळजी घेणे, मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करणे आणि ऊन टाळून कामे करणे, हेच आपल्या हातात आहे. आरोग्य विभागाने दुपारी घराबाहेर न पडण्याचे, सुती कपडे वापरण्याचे आणि भरपूर पाणी पिण्याचे आवाहन केले आहे. मात्र, केवळ तात्पुरत्या उपाययोजनांनी हे संकट टळणारे नाही, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिक तापमान वाढीमुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे, ज्याचा थेट परिणाम भारताच्या उन्हाळ्यावर होत आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत असल्याने अनेक शहरात 'अघोषित संचारबंदी' अनुभवला मिळत आहे. पॅसिफिक महासागरातील पाण्याच्या तापमानातील बदलांमुळे मान्सूनवर परिणाम होऊन उष्णतेची तीव्रता वाढली आहे. उष्माघाताचे संकट हे निसर्गाचे एक प्रकारची प्रतिक्रिया आहे. आपण निसर्गाचा जो समतोल बिघडवला आहे, त्याचे परिणाम आता आपण भोगत आहोत. जर आपण आताच कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि निसर्ग संवर्धनाकडे लक्ष दिले नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी हा उन्हाळा अधिक असह्य आणि प्राणघातक ठरेल.

# राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका महत्त्वाची : लक्ष्मण वैराळ

## पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालयात ' एनएसएस दिन व मतदार नाव नोंदणी शिबिर उत्साहात संपन्न

### "'One Man – One Vote – One Value' हे लोकशाहीचे सर्वात महत्त्वाचे मूल्य."

■ सिरसाळा/प्रतिनिधी



श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभाग, राज्यशास्त्र विभाग आणि लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय सेवा योजना दिन' तसेच 'मतदार नाव नोंदणी शिबिर' मोठ्या उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. व्ही. जाधव हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. लक्ष्मण वैराळ उपस्थित होते.

यावेळी राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. एच. पी. कदम, प्रा. डॉ. अशोक गोरे आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. दयानंद झिंजुर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. दयानंद झिंजुर्डे यांनी एनएसएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व व सामाजिक विकास घडवला जातो. लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी मतदार जागृती आणि पात्र नागरिकांची नोंदणी होणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी प्रास्ताविकात स्पष्ट केले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. एच. पी. कदम एनएसएस विद्यार्थ्यांचे मन आणि शरीर घडवण्याचे कार्य करते. जात, धर्म, लिंग आणि वंशाचा भेदभाव न करता समता व बंधुता जोपासणे, श्रमाला प्रतिष्ठा देणे आणि स्वावलंबी नेतृत्व विकसित करणे ही या योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत. विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकात्मता आणि सहिष्णुतेचे आत्मचिंतन करावे असे आवाहन केले.

प्रमुख पाहुणे मा. लक्ष्मण वैराळ यांनी महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा संदर्भ देत विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी, असे सांगितले. तरुणांची राष्ट्रनिर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका असून लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने मतदानाचा अधिकार बजावला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. "One Man – One Vote – One Value" या लोकशाही मूल्याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यावेळी महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांच्या मतदार नाव नोंदणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. ए. व्ही. जाधव तरुणांमध्ये समाज परिवर्तनाची प्रचंड ताकद आहे. राष्ट्रभक्ती जोपासताना श्रमाला प्रतिष्ठा दिली पाहिजे. मतदानाचा हक्क हा लोकशाहीने दिलेला अत्यंत पवित्र अधिकार आहे, त्यामुळे त्याचा वापर जबाबदारीने करा आणि मतदानाचा हक्क कधीही विक्रीस काढू नका, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बालाजी साबळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. अशोक गोरे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी एनएसएस, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागातील प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## नास्तिक व आस्तिक,चार्वाक, समजून घ्या सनातन परंपरा जपली पाहिजे .भास्कर मामा चाटे

■ बीड प्रतिनिधी

छायाचित्रकार संघटना गणेशोत्सव निमंत्रित श्रीगणेश आरती नंतर मनोगतात सामाजिक कार्यकर्ते जेष्ठ मार्गदर्शक मा.भास्करराव चाटे मामा यांनी वरील विचार मांडले व उपस्थित सर्वांनी याचे श्रवण केले.कर्णातुन ह्रदयात साठवले.

सामाजिक कार्यकर्ते, जेष्ठ मार्गदर्शक नेते सर्व परळी मान्यता प्राप्त मामा म्हणजेच सन्माननीय भास्कर चाटे मामा, यांना व भा.ज.पा.युवा नेते निळकंठजी चाटे यांना, छायाचित्रकार संघटना गणेशोत्सव श्रीआरतीसाठी निमंत्रित केले होते.यावेळी मानाचा फेटा बांधून स्वागत करण्यात आले.मानवरांच्या व यजमान श्री.व सौ.विठ्ठलराव झिलमेवाड श्रीआरती शुभ हस्ते श्रीगणेश आरती करण्यात आली.

यानंतर मान्यवरांचे सन्मान स्थापित गणेश प्रतिमा प्रतिबिंबित छायाचित्र स्मृती चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. भास्कर मामांचा सन्मान विठ्ठलराव झिलमेवाड, शिवकुमार फड यांनी तर निळकंठजी चाटे याचा सन्मान महादेव तिडके, शिवकुमार फड, राहुल कुरकुट, राजाराम तोरडमल यांनी केला.

श्रीगणेशमुर्ती पाहुन चाटे मामांनी प्रबोधन केले, चांगले कर्म करा.विचार करा.आचरण करा. जगाला मातीच्या कणा पासुन ते ग्रह तारे खगोलीय घटना वेळ काळ तंतोतंत सांगणारे नासा व भारतीय संस्कृतीचे पंचांग एकत्र येऊन ठरवतात.नव्हे तर नासाच्या शास्त्रज्ञांनी सुद्धा मान्य केले असे अगाध ज्ञान देणाऱ्या भारत मातेच्या देशात आपला जन्म झाला. आपण भाग्यवान आहोत.

छायाचित्रकारांचा गणेशोत्सव मनापासून आनंद देणारा वाटतो. स्तुत्य उपक्रम व कौतुक वाटत आहे.सतत सावध रहा आपल्या धर्माचे पालन करा असे त्यांनी स्पष्ट आवाहन केले. या वेळी निमंत्रित मान्यवर निळूभाऊ चाटे यांनी, श्रीगणेश संकल्पना आवडली,व छायाचित्रकार संघटना, गणेशोत्सव पदाधिकारी व कार्यकर्ते सर्व जणांना शुभेच्छा, धन्यवाद दिले.कोणत्याही अडचणीसाठी मला संपर्क करावा असे निर्देश देण्याचे ते विसरले नाहीत.पुढील वर्षी यापेक्षा भव्य दिव्य गणेशोत्सव साजरा करा म्हणून मदतीचा हात पुढे आहेत असेही सांगितले.प्रसंगी

## महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापनादिन सोहळा उत्साहात संपन्न

■ परळी प्रतिनिधी




येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवायोजना स्थापनादिन सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला . या प्रसंगी अध्यक्ष म्हणून लाभलेले संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. प्रसादजी देशमुख, प्रमुख पाहुण्या प्राचार्या डॉ व्ही व्ही देशपांडे व प्रमुख व्याख्याते प्रा.डॉ एल. एस. मुंडे आदि मान्यवरांच्या शुभहस्ते रासेयोचे प्रेरणास्थान असलेले राष्ट्रीय संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले .

राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या जन्म शताब्दीचे औचित्य साधून २४ सप्टेबर १९६९ रोजी राष्ट्रीय सेवायोजनेचा प्रारंभ झाला . Not me but you हे ब्रीद घेऊन विद्यार्थ्यां मध्ये समाजविषयक सेवाभावना व नेतृत्व गुणांचा उत्कर्ष व्हावा हे रासेयोचे साध्य आहे असे विचार या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ विवेकानंद कवडे यांनी मांडले .

या प्रसंगी प्रमुख वक्ते लाभलेले महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. एल. एस. मुंडे यांनी त्यांच्या व्याख्यानात रासेयोच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या यशस्वी कार्याचा आढावा घेतला . रासेयोच्या बोधचिन्हाचे यथार्थ वर्णन केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागातून घडलेल्या आपल्या महाविद्यालयातील कु सय्यद जरीना व कु . विजयालक्ष्मी ठोंबरे या विद्यार्थिनींच्या कार्याचाही त्यांनी गौरव केला . या योजनेत भारताला फिल्डवर काम करणारे असंख्य स्वयंसेवक दिले . विद्यार्थी जीवनापासून त्यांच्यांत सामाजिक जाण निर्माण करण्यांत या रासेयोचा फार मोठा वाटा आहे असे विचार त्यांनी मांडले . अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांनी रासेयो स्थापना दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या व अभ्यासा सोबत जीवन प्रगल्भ होण्यासाठी लागणारे ज्ञान - अनुभव हे रासेयोच्या शिबिरातच मिळत असतात असे विचार प्रतिपादन केले .

राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त महाविद्यालयातील रासेयोच्या स्वयंसेवक विद्यार्थिनींनी महाविद्यालय परिसर स्वच्छ केला.

या रासेयो स्थापनादिन सोहळ्याचे सूत्र संचालन व प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. विवेकानंद कवडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ संगीता कचरे यांनी केले . या सोहळ्यात महाविद्यालयातील रासेयोच्या डॉ संगिता कचरे , डॉ. विद्या गुळभिले, डॉ. राजश्री कल्याणकर, डॉ रंजना शहाणे, प्रा तृप्ती तंवर, डॉ. श्याम नेरकर यांसह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी वर्गाचा प्रचंड सहभाग लाभला .

# 'कुपोषणमुक्त भारत'च्या संकल्पासाठी जनजागृती; पोषण महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद

■ परळी / प्रतिनिधी

केंद्रीय संचार ब्युरो (प्राथमिक कार्यालय, पुणे) आणि बालविकास प्रकल्प परळी यांच्या संयुक्त विद्यमाने सिरसाळा येथील अंगणवाडीत 'पोषण माह' अंतर्गत एका विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी 'जय भवानी लोक परिवर्तन प्रतिष्ठान (रेवली)' च्या शाहिरी कलापथकाने आपल्या बहारदार लोककलेतून कुपोषणमुक्त भारताचा संदेश देत उपस्थितांची मने जिंकली.

सिरसाळा गावचे सरपंच नशीब शेख आणि पर्यवेक्षिका बिजली रोडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात शाहीर गईदास उगले, सुभाष शिंदे, श्याम काटे, जगदीश सिंगणाथ, किशोर काटे आणि सचिन धुमाळ या कलावंतांनी सहभाग घेतला. या कलाकारांनी गण, गवळण, वासुदेव, लोकगीत आणि गोंधळ अशा विविध पारंपरिक लोककलांचे सादरीकरण करत अतिशय रंजक



पद्धतीने पोषण आहाराचे महत्त्व पटवून दिले. या कलापथकाच्या माध्यमातून गरोदर मातांनी घ्यावयाचा सकस पोषण आहार, आहारात फळभाज्या आणि दुधाचा नियमित वापर याविषयी जनजागृती करण्यात आली. तसेच, अंगणवाडी आणि पोषण अभियानात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी 'पंखुडी पोर्टल' आणि 'पोषण ट्रॅकर ॲप'च्या (Poshan Tracker) वापराबाबतही सविस्तर माहिती देण्यात आली. देशातून कुपोषण हद्दपार व्हावे, या मुख्य उद्देशाने हे प्रबोधन करण्यात आले.

या नावीन्यपूर्ण कार्यक्रमास गावातील महिला आणि बाल मित्र मंडळाने मोठी गर्दी केली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आणि नियोजनासाठी अंगणवाडी कार्यकर्त्या प्रियंका जोगदंड, नंदा लगाडे, जनाबाई काळे, मंगल किरवले, अलका देशमुख, मीरा कटारे, संगीता चोपडे, राजश्री थोरे, ललिता चोपडे, माया किरवले, आणि सत्यभामा बनसोडे या आवर्जून उपस्थित होत्या. तसेच, जिल्हा परिषदेचे सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थीही मोठ्या संख्येने हजर होते. माहिती आणि मनोरंजनाचा सुरेख संगम असलेल्या या जनजागृती कार्यक्रमाला सिरसाळा ग्रामस्थांकडून भरभरून आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते यांच्या युवा फिटनेस सेंटर जिमचे उत्साहात उद्‌घाटन








**परळी वैजनाथ (प्रतिनिधी):-**

परळी शहरातील वाढत्या फिटनेस क्रेझला नवे बळ देणाऱ्या 'युवा फिटनेस सेंटर' या अत्याधुनिक युनिसेक्स जिमचा भव्य शुभारंभ राज्याचे माजी मंत्री आ. धनंजयजी मुंडे साहेब यांच्या हस्ते फित कापुन रविवार दि. २० सप्टेंबर रोजी संपन्न आले.

एचडीएफसी बँके जवळ, मोंढा मार्केट परिसरात सुरु झालेल्या युवा फिटनेस सेंटर जिमचे उद्‌घाटन माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव (भैय्या) धर्माधिकारी, युवा फिटनेस सेंटरचे मुख्य आधारस्तंभ प्रमोद वेरूळे (भाऊजी), महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असो. चे उपाध्यक्ष गोपाळ गायकवाड (सर), उपनगराध्यक्ष पती राजा खान , फिटनेस कोच अँड न्यूट्रीशनिस्ट, नांदेडचे अमन कोंका (सर), पद्मावती शिक्षण संस्था, परळी वै. चे सचिव दिपक तांदळे, सारंग पुजारी (माजी उपनगराध्यक्ष, अंबाजोगाई), परळी नगरसेवक सचिन सारडा, भीमराव (गुरु) डावरे, सौ. अश्विनीताई राहुल केंदे, लक्ष्मण (पिंटू) मुरकुटे भाजपा नेते निळकंठ चाटे, सोमनाथअप्पा महाजन, पत्रकार संजय खाकरे, चेतन (सर) सोंदळे, डॉ. वैभव दुबे, डॉ. दुष्यंत देशमुख, ज्येष्ठ क्रीडा शिक्षक सुभाष नाणेकर (सर) आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सर्व मान्यवरांचे स्वागत जिमचे संचालक शेखर मन्मथआप्पा सुगरे यांनी केले. JERAI, Aerofit च्या आधुनिक उपकरणांची भव्य रेंज-युवा पिढीसह विविध वयोगटातील नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैलीसाठी आधुनिक व्यायाम सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने युवा फिटनेस सेंटरची उभारणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, येथे JERAI आधुनिक आयात केलेली व्यायाम उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यामुळे व्यायामप्रेमींना अत्याधुनिक आणि Acrofit या कंपन्यांची साधनसामग्रीच्या माध्यमातून आपल्या फिटनेसबर काम करण्याची सुविधा एकाच छताखाली मिळणार आहे.

फिटनेसप्रेमींसाठी नवे आकर्षण आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत व्यायाम आणि तंदुरुस्तीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ही गरज लक्षात घेऊन युवा फिटनेस सेंटरमध्ये आधुनिक उपकरणांसह व्यायामासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. युवा पिढीपासून सर्व वयोगटातील नागरिकांमध्ये नियमित व्यायामाची सवय निर्माण व्हावी आणि आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

परळी शहरातील फिटनेस क्षेत्रात आधुनिक सुविधांची भर घालणाऱ्या 'युवा फिटनेस सेंटर'चा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ऑल इंडिया युनिव्हर्सिटी चॅम्पियन, ज्युनियर महाराष्ट्र श्री व नाशिक श्री शेखर मनमथअप्पा सुगरे यांनी केले आहे. अधिक माहित्तीसाठी संपर्क: ९८८११८२००५ येथे संपर्क साधावा. या कार्यक्रमास शहरातील व्यापारी ,युवक ,महिला, पुरुष आधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परळीतील संशोधक युवकाच्या 'स्मार्ट शेती' संकल्पनेतील उपकरण डिझाईनला केंद्राची मान्यता

### प्रा. डॉ.गिरीश चाटे यांच्या मृदा प्रतिमा ओळख व पीक शिफारस उपकरण डिझाइनला भारत सरकारचे पेटंट

**परळी वैजनाथ : प्रतिनिधी**

शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण प्रयत्न सुरू आहेत. 'डीप लर्निंग-बेस्ड सॉईल इमेज रिकग्निशन अँड क्रॉप रिकमेंडेशन डिव्हाइस' या उपकरणाच्या डिझाइनची भारत सरकारच्या पेटंट, डिझाइन आणि ट्रेडमार्क कार्यालयाकडे नोंदणी करण्यात आली आहे. या नोंदणीचे प्रमाणपत्र गिरीश दशरथ चाटे यांच्या नावावर जारी करण्यात आले आहे. यामुळे परळीतील युवकाच्या 'स्मार्ट शेती' संकल्पनेला केंद्राची मान्यता मिळाली आहे.गिरीश दशरथ चाटे यांच्या मृदा प्रतिमा ओळख व पीक शिफारस उपकरण डिझाइनला भारत सरकारचे पेटंट मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या पेटंट कार्यालयाने गिरीश चाटे यांच्या या डिझाइनला नुकतेच पेटंट प्रमाणपत्र जारी केले आहे.



या उपकरणाच्या नावावरून मातीच्या प्रतिमांचे डीप लर्निंग तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विश्लेषण करणे आणि पीक निवडीसाठी शिफारस करणे, अशी त्याची संकल्पना असल्याचे स्पष्ट होते.शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत असताना अशा प्रकारच्या उपकरणांच्या विकासाला महत्त्व प्राप्त होत आहे. शेती क्षेत्रातील तंत्रज्ञानाधारित नवकल्पनांना प्रोत्साहन मिळत असताना या उपकरणाच्या डिझाइनची नोंदणी ही संशोधन आणि नावीन्यपूर्ण संकल्पनांच्या दृष्टीने उल्लेखनीय बाब मानली जात आहे. मातीच्या प्रतिमांची ओळख आणि पीक शिफारशीशी संबंधित तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती अधिक माहितीपूर्ण व तंत्रज्ञानस्नेही करण्याच्या प्रयत्नांना यामुळे नवी दिशा मिळू शकते.

परळी वैजनाथ तालुक्यातील मांडवा येथील रहिवासी असलेले प्रा. डॉ.गिरीश दशरथ चाटे यांनी संशोधनात्मक हे उपकरण डिझाईन निर्माण केले असून त्याला स्मार्ट शेती संकल्पनेतील संशोधनात्मक कार्यात केंद्राने मान्यता दिली आहे. याबाबतचे अधिकृत पेटंट प्रमाणपत्र त्यांना जारी करण्यात आले आहे. संशोधनाच्या क्षेत्रात या यशस्वी कार्याबद्दल गिरीश चाटे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे काही दिवसांपूर्वीच गिरीश चाटे यांना विद्याक्षेत्रातील मानाची समजली जाणारी पीएचडी पदवीही प्रदान करण्यात आलेली आहे.

## अहिल्यानगर-पाथर्डी मार्गावर मराठवाडीजवळ खासगी ट्रॅव्हल्स उलटली; २० प्रवासी जखमी

**आष्टी प्रतिनिधी :**

पुण्याहून नांदेडकडे निघालेली खासगी ट्रॅव्हल्स अहिल्यानगर- पाथर्डी मार्गावर अचानक तांत्रिक बिघाड झाल्याने रस्त्यावर पलटी झाल्याची घटना घडली.हा अपघात आष्टी तालुक्यातील मराठवाडी येथील हॉटेल सम्राटसमोर पहाटे ३:२५ वाजण्याच्या सुमारास घडला. सुदैवाने या भीषण अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.बसमधील सर्व २० प्रवासी जखमी झाले आहेत.

'स्वामी टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स'ची बस (क्रमांक ए.आर. ०६ बी.६७००) पुण्यावरून अहिल्यानगर-पाथर्डी मार्गे नांदेडच्या दिशेने २० प्रवाशांना घेऊन जात होती.पहाटेच्या सुमारास बहुतांश प्रवासी गाढ झोपेत असताना आष्टी तालुक्यातील मराठवाडी शिवारात ट्रॅव्हल्समध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाला. यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बस थेट रस्त्यावर उलटली.अचानक झालेल्या या अपघातामुळे प्रवाशांमध्ये एकच घबराट उडाली; मात्र नशीब बलवत्तर असल्याने सर्व प्रवासी मोठ्या अनर्थातून बचावले. जखमी प्रवाशांना तात्काळ उपचारासाठी अहिल्यानगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पहाटे ३:२५ च्या सुमारास अपघाताची माहिती मिळताच अंभोरा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे



यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तातडीने हालचाली केल्या.पोलीस अंमलदार शिवदास केदार,अमोल शिरसाट ,कृष्णा नरवडे, प्रकाश पडवळ, सोपान येवले आणि होमगार्ड धुमाळ यांनी ३० मिनिटांत घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य राबवून सर्व जखमी प्रवाशांना खाजगी रुग्णवाहिकेव्दारे उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलवले.

## बहुजन विकास सांस्कृतिक कला मंचच्या परळी तालुका अध्यक्षपदी अनंत मुंडे यांची निवड





**परळी / प्रतिनिधी**

बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच मुंबई, या महाराष्ट्र राज्य शासनमान्य संस्थेच्या परळी तालुकाध्यक्षपदी येथील सुप्रसिद्ध शाहीर तथा नामवंत कवी अनंत मुंडे यांची निवड करण्यात आली आहे.

राज्यातील तळागाळातील कलावंतांना शासनाच्या सवलती, शासनाचे मानधन मिळवून देण्यासाठी व सांस्कृतिक चळवळ गतिमान करण्यासाठी तसेच याशिवाय छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आदी महामानवांच्या विचारांचा प्रचार व प्रसार सांस्कृतिक चळवळीतून प्रभावीपणे करून ही चळवळ अधिक गतिमान करण्याच्या उद्देशाने बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष गीतकार तथा सुप्रसिद्ध गायक दत्ताजी शिंदे यांनी परळी तालुक्याचे अध्यक्ष म्हणून कवी /शाहीर अनंत मुंडे यांची निवड केली आहे.

आजवर अनंत मुंडे यांनी शैक्षणिक,साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय तसेच भरीव योगदान दिलेले आहे याचीच दखल म्हणून बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच मुंबई या शासन मान्य संस्थेने अनंत मुंडे यांची निवड केल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

या निवडीबद्दल त्यांचे मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष मा.श्री.पी.एस.घाडगे,केज येथील टाकळी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री बाबासाहेब केदार,मसापचे अध्यक्ष विजयसेठ वाकेकर, सचिव प्रा.राजकुमार यल्लावाड, बंडू अघाव, कवी अरुण पवार, संजय आघाव, बालाजी कांबळे, दिवाकर जोशी, सिध्देश्वर इंगोले,प्रा.अर्चना चव्हाण राजू शिंदे आदींनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## जागतिक फार्मासिस्ट दिन - रुग्णसेवेचा खरा दुवा



**महागाव | प्रतिनिधी**

दरवर्षी २५ सप्टेंबर हा दिवस जगभरात 'जागतिक फार्मासिस्ट दिन' म्हणून साजरा केला जातो. इंटरनॅशनल फार्मास्युटिकल फेडरेशन (FIP) ने २०१० साली या दिवसाची सुरुवात केली. डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून फार्मासिस्टची भूमिका अधोरेखित करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.

यावर्षी २०२६ ची अधिकृत थीम "Empowering Pharmacists for Healthier Futures - निरोगी भविष्यासाठी फार्मासिस्टना सक्षम बनवणे" अशी आहे.

जागतिक फार्मासिस्ट डे.. रुग्ण व पेशंट मधील महत्त्वाचा दुवा असतो फार्मासिस्ट.. रात्रंदिवस रुग्णांच्या हितासाठी अविरत कार्य करत असतो.


फार्मासिस्ट हा केवळ औषध देणारा नसून तो समाजाचा आरोग्य मार्गदर्शक आहे. योग्य औषध, योग्य डोस, औषधांचे दुष्परिणाम, औषध कसे घ्यावे याबद्दल समुपदेशन करणे, रुग्णांमध्ये औषधांबद्दल जनजागृती करणे, साथीच्या काळात अहोरात्र सेवा देणे ही कामे फार्मासिस्ट अविरतपणे करतो.

ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत आरोग्य यंत्रणेचा कणा म्हणून फार्मासिस्ट काम करत आहे. वाढते आजार, बदलती जीवनशैली आणि डिजिटल आरोग्य सेवेत फार्मासिस्टची भूमिका दिवसेंदिवस अधिक महत्त्वाची होत चालली आहे.

दरवर्षीप्रमाणे स्व. जयवंतराव गावंडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व पुसद फार्मासिस्ट परिवाराचे समन्वयक फार्मासिस्ट प्रशांत गावंडे हे जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त फार्मासिस्ट सप्ताह राबवून विविध कार्यक्रमाचे आयोजन करतात. आज जिल्हा परिषद उच्च मराठी शाळा बोरगडी तालुका पुसद येथे विद्यार्थ्यांना औषध साक्षरता बद्दल व्याख्यान पुसद येथील सीनियर फार्मासिस्ट सुशांत महल्ले यांच्यामार्फत करण्यात आले, त्याचबरोबर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र संस्थेचे अध्यक्ष प्रशांत गावंडे यांच्या समवेत सर्व मान्यवर मंडळींच्या हस्ते फुलगुच्छ सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले, त्याचबरोबर सर्व विद्यार्थ्यांना कंपास पाऊच वाटप करण्यात आले, यावेळी राष्ट्रीय सैनिक संस्थेचे पुसद शहर अध्यक्ष श्रीकांत पांचाळ, फार्मासिस्ट श्रीकांत गावंडे, औषध प्रतिनिधी संतोष मेटकर हजर होते.

सर्व फार्मासिस्ट भगिनी व बांधवांचे मनःपूर्वक आभार व त्यांच्या कार्याला सलाम. त्यांच्या निस्वार्थ सेवेमुळेच समाज निरोगी राहत आहे. स्वास्थ्याची काळजी, विश्वासाची हमी हिच आमची ओळख. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमेश अडकिने सर यांनी केले तर आभार प्रदर्शन आहाळे मॅडम यांनी केले.

दैनिक अतुल्य महाराष्ट्र
बीड, शुक्रवार, 25 सप्टेंबर 2026



# आमदार सुरेश धस थेट बांधावर दुष्काळी परिस्थितीची केली पाहणी

## पावसाअभावी उभी पिके वाया शेतकरी-पशुपालकांच्या व्यथा जाणून घेतल्या

## दिवाळीपूर्वी मदतीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश स्वागतार्ह

**आष्टी (प्रतिनिधी)**

पावसाने पाठ फिरवल्याने आष्टी तालुक्यासह आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांच्या हातची उभी पिके वाया जाण्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी गुरुवारी आष्टी तालुक्यातील मांडवा, वटणवाडी, शेरी बु. आणि खकाळवाडी परिसरात प्रत्यक्ष बांधावर जाऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली.

मांडवा येथून पाहणी दौऱ्याला सुरुवात करत आमदार धस यांनी विविध गावांतील शेतांमध्ये जाऊन पिकांची स्थिती आणि नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी व पशुपालकांशी संवाद साधत पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता याबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली.

पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, बाजरी, मका आदी खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यांतील शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले असून, ऊस वगळता बहुतांश पिकांना पावसाच्या लहरीपणाचा मोठा फटका बसला आहे.

### ■ आष्टीत १०० टक्के खरीप क्षेत्राचे नुकसान

आष्टी तालुक्यात खरीप हंगामात पेरणी झालेल्या १०० टक्के क्षेत्राचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल प्रशासनाने शासनाकडे सादर केला आहे. शासनाकडून दुष्काळ जाहीर झाल्यानंतर शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत जमा केली जाईल,



आष्टी तालुक्यात सोयाबीनचा मोठ्या प्रमाणात पेरा झाला असून, पाटोदा तालुक्यात ५१ हजारांहून अधिक हेक्टर क्षेत्रावर पिकांची लागवड झाली आहे. तर शिरूर तालुक्यात कापसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे या तिन्ही तालुक्यांतील शेतकऱ्यांना पावसाअभावी मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत आहे.

### ■ दिवाळीपूर्वी मदतीचे निर्देश स्वागतार्ह

शेतकऱ्यांच्या संकटाकडे सुरुवातीपासूनच शासनाचे लक्ष वेधत असून, तातडीने मदत मिळावी यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले.



दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री व आमदारांना प्रत्यक्ष बांधावर जाऊन पीक नुकसानीची पाहणी करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच मुख्यमंत्री स्वतः पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील विविध भागांचा आढावा घेत आहेत. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत जमा करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश स्वागतार्ह असून, संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे, असे आमदार धस यांनी नमूद केले.

### ■ चारा-पाण्यासह पंचनाम्यांना गती देण्याच्या सूचना

दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकरी व पशुपालकांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. नुकसानीचे पंचनामे, शासकीय मदत तसेच जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना आमदार धस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

पाहणीदरम्यान शेतकरी व पशुपालकांनी पिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई, जनावरांसाठी चारा-पाण्याची कमतरता यासह विविध समस्या आमदार धस यांच्यासमोर मांडल्या. या सर्व समस्यांची दखल घेत प्रत्यक्ष नुकसानीच्या आधारे शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहू, असा विश्वास आमदार धस यांनी शेतकरी व पशुपालकांना दिला.



यावेळी दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करताना तहसीलदार वैशाली पाटील, गटविकास अधिकारी प्रशांत ढमाळ, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, संदीप सकाळ, महेश खकाळ, किरण शिनगिरे, रावसाहेब मुटकुळे यांच्यासह महसूल, कृषी, ग्रामविकास विभागातील अधिकारी-कर्मचारी, ग्रामसेवक, तलाठी,पत्रकार तसेच संबंधित सर्व विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. यावेळी परिसरातील ग्रामस्थ व नागरिक उपस्थित होते.

# काळी दौलतखान सर्कलमधील दुष्काळग्रस्त भागाची राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केली पाहणी

**महागाव प्रतिनिधी**

महागाव तालुक्यातील काळी दौलतखान सर्कलमध्ये कोनदरी कासोळा काळी कोरड्या दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, या पार्श्वभूमीवर राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन दुष्काळग्रस्त भागाची पाहणी केली.

नदी-नाले, तलाव व जलसाठे कोरडे पडल्याने परिसरात पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. सोयाबीन, कापूस व तूर या प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

यावेळी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी शेतकऱ्यांशी आदरपूर्वक संवाद साधत त्यांच्या समस्या, पीक परिस्थिती आणि झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष माहिती जाणून घेतली. शेतकऱ्यांनी मांडलेल्या प्रत्येक अडचणीची गांभीर्याने दखल घेत, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे त्यांनी सांगितले. दुष्काळग्रस्त परिस्थितीची तातडीने नोंद घेऊन पंचनामे करण्याची कार्यवाही वेगाने करण्याच्या सूचना संबंधित प्रशासनाला देण्यात आल्या.



शेतकऱ्यांना दिलासा देताना राज्यमंत्री नाईक यांनी दुष्काळी परिस्थितीत आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा केला जाईल, तसेच पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले.

यावेळी प्रशासनाचे परिवीक्षाधीन उपविभागीय अधिकारी एकले, गटविकास अधिकारी एस. एम. चव्हाण, विस्तार अधिकारी एस. डी. जाधव, ग्रामपंचायत अधिकारी विपुल भवरे, महावितरणचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, तलाठी, कृषी सहाय्यक, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या व्यथा ऐकून घेणाऱ्या राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या पाहणीमुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीची अपेक्षा निर्माण झाली.

# श्री गणरायाने दुष्काळाचे संकट दूर करून शेतकरी व जनतेला सुखी-समाधानी करावे : प्रा. अतुल दुबे

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी वैजनाथ येथील श्री मंगलनाथ बँकेच्या परळी शाखेत श्री गणरायाची आरती जय महाराष्ट्र प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. अतुल दुबे सर यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात करण्यात आली. यावेळी मंगलनाथ बँकेच्या परळी शाखेचे मुख्य व्यवस्थापक श्री. गजानन हालगे यांच्यासह बँकेचे सर्व कर्मचारी, ग्राहक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. अतुल दुबे म्हणाले की, सध्या राज्यावर दुष्काळाचे सावट असून शेतकरी व सर्वसामान्य जनता मोठ्या संकटाचा सामना करीत आहे. अनेक ठिकाणी जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा तसेच चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. श्री गणरायाने हे सर्व संकट दूर करून शेतकरी, कष्टकरी आणि जनतेला सुखी-समाधानी ठेवावे, अशी प्रार्थना त्यांनी श्री गणरायाच्या चरणी केली.

गणरायाच्या कृपेने राज्यात भरपूर पाऊस पडून दुष्काळाचे संकट दूर व्हावे आणि सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी व समाधान नांदावे, असे साकडेही प्रा. अतुल दुबे यांनी श्री गणरायाला घातले.



# नैतिक अधिष्ठान असलेला समाज निर्माण केल्याशिवाय स्वातंत्र्याला कसलाच अर्थ नाही - डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

शालेय विद्यार्थ्यांवर नैतिक मूल्य असलेले विचार संस्कार दिले तरच नैतिक अधिष्ठान असलेला समाज निर्माण होईल आणि हा नैतिक अधिष्ठान असलेला समाज नैतिक मूल्य असलेल्या राष्ट्राची उभारणी करू शकेल आणि हे नैतिक मूल्य जपणारे राष्ट्र हे महासत्ता बनेल त्यामुळे नैतिक अधिष्ठान असलेली समाज रचना राष्ट्रासाठी खूप गरजेचे आहे त्याशिवाय मिळालेल्या स्वातंत्र्याला कसलाच अर्थ प्राप्त होणार नाही अशी प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर क्षितिज बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे



अध्यक्ष संतोष कुलकर्णी तसेच सुप्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ अखिलेश अंजान यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते सर्व महापुरूषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.इंगोले यांनी विद्यार्थी हा सभोवतालचे वातावरण तसेच आपल्या सभोवताली असणाऱ्या व्यक्तींचे वागणे, बोलणे हे निरीक्षणाने शिकत असतो. त्यानुसार त्याची व्यक्तिमत्व घडत असते. विद्यार्थ्यांच्या सभोवताली संस्कृत व्यक्ती असेल योग्य आचरण करणारे वातावरण असेल योग्य संस्कृती असेल तर त्या विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व हे संस्कारी सर्जनशील बनते. त्यामुळे नैतिक मूल्य असणारे विचार जर विद्यार्थ्यांच्या बाल मनात त पेरले गेले तर नैतिक अधिष्ठान असलेली समाज रचना निर्माण होईल ही नैतिक अधिष्ठान असलेली समाज रचना भारताला नैतिक राष्ट्र बनवेल आणि नैतिक दृष्ट्या संपन्न असलेला देश हा महासत्ता बनत असतो. त्यामुळे या वयात योग्य संस्कार मिळणे गरजेचे आहे हे डॉ.राजेश इंगोले यांनी निक्षून सांगितले. पालकांनीही केवळ आपला पाल्य शाळेत सोडला म्हणजे आपले कर्तव्य संपले असे मानण्याची कारण नाही आपल्या घरी ही आपल्याला आपल्या पाल्यांवर योग्य संस्कार कसे देता येतील याकडे लक्ष दिले पाहिजे. आपल्या पाल्याला आपण एखादी गोष्ट सांगत असताना आपण त्या गोष्टीचे काटेकोरपणे पालन करत आहोत का नाही हे तपासणी गरजेचे असते कारण मुलांना असे करा असे करू नका हे सांगण्यापेक्षा जर आपण कृतीतून ती गोष्ट प्रत्यक्षात उतरवली तर त्याचा परिणाम जास्त असतो. मुलांच्या जडणघडणीमध्ये पालकांसोबतच शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. आई ही मुलाची पहिली शाळा असते आणि शाळा ही मुलांची दुसरी आई असते या वाक्यात या दोन्ही घटकांचे महत्त्व अधोरेखित केले आहे असेही डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. तर यावेळी डॉ.इंगोले यांनी विविध उदाहरणे देत चांगल्या सवयी व वाईट सवयी याचे स्पष्टीकरण केले. आपल्या पाल्यांना मोबाईल, टी.व्ही तसेच अन्य वाईट सवयींपासून दूर कसे ठेवावे याची माहिती डॉ.इंगोले यांनी उपस्थित पालकांना शिक्षकांना व विद्यार्थ्यांना दिली. पालकांनी आपल्या मुलांचे सुप्त गुण ओळखून त्याला त्या क्षेत्रात त्याचे ध्येय कशी साध्य करता येईल यासाठी काही मार्गदर्शक सूचना केल्या. यावेळी उपस्थित पालकांनी डॉ.राजेश इंगोले यांना मुलांच्या अभ्यास विषयक तसेच वर्तणूक विषयक समस्या याबाबत प्रश्न विचारून त्यांचे शंका निरसन करून घेतले. यावेळी अखिलेश अंजान यांनी मुलांनी निरोगी कसे राहावे याकरिता सखोल मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी मुलांच्या अभ्यासाबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये विकास घडवून आणण्यासाठी संस्थेतर्फे विविध उपक्रम राबविले जातात त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अमुलाग्र बदल होतो असे सांगितले. मुलांना ध्येयाकडे नेण्यासाठी संस्थेचे सर्व शिक्षक अहोरात्र प्रयत्न करतात ही संस्थेच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे असे सांगत विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये सकारात्मक बदल घडून आणण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर करत आपल्या कला सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आश्विनी गिरी यांनी केले तर आभार अंकिता कुलकर्णी यांनी मानले.